# ५०८ विद्यार्थी 'सेट' परीक्षा उत्तीर्ण

कोल्हापूर : राज्य पात्रता परीक्षेत (सेट) शिवाजी विद्यापीठ केंद्रातून परीक्षा दिलेल्या ७५६९ विद्यार्थीपैकी ५०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाची टक्केवारी ६.८ इतकी आहे. सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्यावतीने कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील ३८ हून अधिक विषयांसाठी २३ जून रोजी 'सेट' ची परीक्षा घेण्यात आली. शुक्रवारी दुपारी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. राज्यभरातून सुमारे ७९८७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या केंद्रातून ९५१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. १९ केंद्रावर ही परीक्षा झाली. त्यापैकी परीक्षेला ७५६९ विद्यार्थी उपस्थित होते. १९४३ विद्यार्थी गैरहजर राहिले. राज्यातून 'सेट' परीक्षेत ५४१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# विद्यार्थी मेळावा आज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एमबीए या विभागातील सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवारी (ता. १२) आयोजित केला आहे. सकाळी ११ वाजता विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात हा मेळावा होणार असून २००४ पासूनच्या सर्व बॅचच्या विद्यार्थ्यांनी या मेळाव्यास उपस्थित रहावे, असे आवाहन विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

# 'सेट' परीक्षेत विद्यापीठ केंद्रातून ५०८ विद्यार्थी उत्तीर्ण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्य पात्रता परीक्षेत (सेट) शिवाजी विद्यापीठ केंद्रातून परीक्षा दिलेल्या ७५६९ विद्यार्थ्यांपैकी ५०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालाची टक्केवारी ६.८ आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील ३८ हून अधिक विषयांची २३ जून रोजी 'सेट'ची परीक्षा घेण्यात आली. शुक्रवारी दुपारी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला. राज्यभरातून सुमारे ७९८७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या केंद्रातून ९५१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. १९ केंद्रांवर परीक्षा झाली. त्यापैकी परीक्षेला ७५६९ विद्यार्थी उपस्थित होते. १९४३ विद्यार्थी गैरहजर राहिले. विद्यापीठ केंद्रातून ५०८ विद्यार्थी तर राज्यातून 'सेट' परीक्षेला ५४१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, अशी माहिती डॉ. प्रशांत अनभुले यांनी दिली.

# वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सकारात्मकतेत वाढ : कुलगुरू

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा बहुआयामी विकास होण्यास मदत होते. तसेच जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

ते श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे न्यू कॉलेज आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, सध्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या पलीकडे जाऊन विचारमंथन करणे गरजेचे आहे.



यावेळी डॉ. डी. आर. मोरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील, व्हा. चेअरमन आर. डी. पाटील, सांस्कृतिक कार्यक्रम समितीप्रमुख विनय पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील आदी उपस्थित होते.

आभार कविता गगराणी यांनी मानले. सूत्रसंचालन एस. एच. शेटके, यू. के. गायकवाड, मनीषा नायकवडी यांनी केले.

लोकमत



विद्यापीठ वृत्त

# विद्यापीठात आज माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए. विभागातर्फे आज, शनिवारी सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात माजी विद्यार्थी मेळावा आयोजित केला आहे. त्यासाठी एम.बी.ए. विभागाचे २००४ ते २०१८ पर्यंतचे माजी विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी दिली.

लोकमत

# इतिहास विभागात स्टुअर्ट गॉर्डन रुजू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये नव्याने सुरु झालेल्या रिसर्च प्रोफेसर योजनेअंतर्गत अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्राध्यापक स्टुअर्ट गॉर्डन यांची नियुक्ती करण्यात आली. या अधिविभागामध्ये ते रुजू झाले असून, मे २०२० पर्यंत ते कार्यरत राहतील. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. सारा दुआल यादेखील फुलब्राईट स्कॉलर म्हणून विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात रुजू झाल्या आहेत. या दोघांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली.

डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांनी युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनमधून सन १९७२ मध्ये पीएच.डी. मिळविली. त्यांनी मराठा राज्याविषयीच्या मूळ कागदपत्रांचा अनुवाद करण्यात कैक वर्षे व्यतीत केली आहेत. त्यांनी सामाजिक बंधने आणि दरोडेखोरी, किल्ल्यांचे इतिहासातील योगदान, वारसाहक्क आणि राजपद, प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याची इतिहासातील उदाहरणे आणि युरोपीय पद्धतीच्या लष्कराचे झालेले अनुकरण अशा वैविध्यपूर्ण विषयांवर लेखन केले आहे. त्यांनी राजघराण्यांच्या वापरातील प्रतीकात्मक वस्तू आणि राजघराण्यांचे मैत्रिसंबंध या विषयांवरही संशोधनात्मक लेखन केले आहे. त्यांचा 'द मराठाज' हा अत्यंत गाजलेला ग्रंथ आहे.

लोकमत

# वक्तृत्व स्पर्धांमुळे बहुआयामी विकास : कुलगुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा बहुआयामी विकास होण्यास मदत होते. त्यातून सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागण्यास मदत होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

न्यू कॉलेज, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला व सांस्कृतिक समितीतर्फे आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन मराठी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन डी. बी. पाटील होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'आजच्या युगात विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचनासह विचारमंथन करणे गरजेचे बनले आहे; त्यासाठी स्पर्धा ही आवश्यक बाब बनली आहे.'

यावेळी डॉ. डी. आर. मोरे, संस्था उपाध्यक्ष आर. डी. पाटील (वडगावकर) प्रा. विनय पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार डॉ. कविता गगराणी यांनी मानले.